## थेपडे विद्यालयात "सायबर शिक्षा - सायबर सुरक्षा" प्रबोधन कार्यक्रम उत्साहात संपन्न

स्वा. से पं ध थेपडे विद्यालया, म्हसावद ता जि जळगाव .दिनांक 24 जुलै रोजी "सायबर शिक्षा - सायबर सुरक्षा" या विषयावर प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन शाळेतील विद्यार्थी, पालक व शिक्षक वर्गात सायबर जगातील वाढत्या धोक्यांबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाचे उपमुख्याध्यापक श्री जी डी बच्छाव सर यांनी सायबर क्राईम विषयी विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण माहिती दिली .प्रमुख मार्गदर्शक म्हणून कवयित्री बहिणाबाई चोधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथील संगणक शास्त्र प्रशाळेतून आलेले विद्यार्थी व सायबर तज्ञ श्री. मयूर बंडे, जय ठाकूर, अक्षय पाटील , जान्हवी सपकाळे, नेहा पाटील उपस्थित होते. त्यांनी इंटरनेटच्या सुरक्षित वापराबाबत, सोशल मीडियाच्या मर्यादा, पासवर्ड सुरक्षा, फसवणुकीचे प्रकार, तसेच सायबर गुन्हेगारीपासून वाचण्याचे उपाय विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

या वेळी विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून आपल्या शंका दूर केल्या. उदाहरणांसह सखोल मार्गदर्शन करण्यात आले. मुख्याध्यापक श्री. पी डी चौधरी सरांनी उपस्थितांचे स्वागत व आभार मानले व सायबर सुरक्षा ही काळाची गरज असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाला विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री के पी पाटील सर व ज्येष्ठ शिक्षक शिक्षिका विचार मंचावर उपस्थित होते .

हा प्रबोधनात्मक कार्यक्रम शाळेच्या यशस्वीतेकडे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरला.

